## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :५४/२०२४/नाशिक**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्रीमती. उज्वला प्रशांत शेवाळे,<br>रा. पितृछाया, प्लॉट नं. १६,<br>संभाजीनगर, मु. पो. ता. कळवण,<br>जि. नाशिक-४२३५०९. | गटशिक्षणाधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय, कळवण,<br>ता. कळवण, जि. नाशिक. |

07 OCT 2025

**सुनावणी दिनांक ०९/०६/२०२५**

तक्रारदार यांनी दिनांक २०/०१/२०२४ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०९/०६/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार तर्फे प्रतिनिधी व संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक २०/०१/२०२४ रोजीच्या तक्रार अर्जात नमुद केले आहे की, "माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार दि. २१/११/२०२३ रोजी केलेल्या अर्जाची दखल न घेणे व माहिती उपलब्ध न करुन देणे. अर्ज दाखल केल्यापासून ३० दिवसांच्या विहित मुदतीत माहिती न देणाऱ्या जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) नुसार दंड व कलम २०(२) नुसार शास्तीची कार्यवाही करावी. प्रथम अपिल अर्ज दाखल केल्यापासून ३० दिवसांच्या विहित मुदतीत माहिती न देणाऱ्या प्रथम अपिलीय माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (८) (ग) नुसार दंड व कलम २० (२) नुसार शास्ती ची कार्यवाही करावी. सोबतच मला झालेल्या आर्थिक, शारीरिक व मानसिक त्रासापोटी मला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(८) (ख) नुसार रुपये १०,०००,०० (दहा लाख रुपये) नुकसान भरपाई देण्यात यावी.

३) तक्रारदार यांनी दि. २१/११/२०२३ रोजीच्या माहिती अर्जान्वये, "आपल्या अधिनस्थ कार्यरत श्री. प्रशांत दिगंबर शेवाळे (प्राथमिक शिक्षक), जि.प.प्राथमिक शाळा विरशेत, केंद्र-कुमसाडी, ता. कळवण, जि. नाशिक यांचा तक्रारी अर्ज दिनांक ०६/१०/२०२३ ला अनुसरुन कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीचे लेखी अभिलेखे दिनांकित स्व:स्वाक्षरीत छायांकित प्रत/ प्रती उपलब्ध होणेबाबत", विनंती केली आहे.

४) सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, तक्रारदार यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. प्रस्तुतच्या तक्रार अर्जासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडून मागविण्यात आलेला अहवाल अद्यापही प्राप्त झालेला नाही. त्यामुळे या तक्रारीची वस्तुस्थिती आयोगाच्या निदर्शनास आलेली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय, कळवण यांनी तक्रारदार यांच्या दि. २०/०१/२०२४ च्या माहिती अर्जास अनुसरुन कोणतीही कार्यवाही केलेली नाही. म्हणुन

त्यांचे विरुध्द माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) नुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी १५ दिवसात आयोगास सादर करावा. त्यांचा लेखी खुलासा विहित मुदतीत आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

२) वरील निर्देशांसह प्रस्तुत तक्रार क्रमांक ५४/२०२४/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

---

जावक क्र ८८४५ 07 OCT 2025